नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १३९ Issue - 139 | वार - बुधवार दि. १४ ऑक्टोबर २०२६ Blow- Wednesday Date 14 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# गंगेत नाव उलटून १३ जणांचा मृत्यू; अनेक बालकांचा समावेश

## अनेक जण पोहून आले बाहेर; तेजस्वी यादव आणि विरोधी पक्षांकडून शोक व्यक्त



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बिहारमधील वैशाली जिल्ह्यातील हाजीपूर येथे मंगळवारी (१३ ऑक्टोबर २०२६) संध्याकाळी एक अत्यंत वेदनादायक आणि हृदयद्रावक दुर्घटना घडली. राघोपूरमधील रामपूर गावात गंगा नदीत ३५ ते ४० प्रवाशांना घेऊन जाणारी नाव अचानक नदीच्या पात्रात उलटली. या अपघातात तब्बल १३ जणांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून मृतांमध्ये लहान मुलांचे प्रमाण जास्त आहे. हे सर्व नागरिक एका अंत्यसंस्काराचे जेवण जेवण्यासाठी जात असताना हा अपघात घडला.नाव अचानक कशी उलटली याचे अचूक कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही घटना विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांच्या राघोपूर मतदारसंघात घडली आहे.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने नदीत धाव घेऊन पाण्यात बुडणाऱ्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू केले. जिल्हा प्रशासन आणि पोलीस यंत्रणा तात्काळ सतर्क झाली असून डऊक्त्र च्या पथकाला पाचारण करण्यात आले. अपघातात जखमी झालेल्यांना रुग्णवाहिकेच्या साहाय्याने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दरम्यान, नाव उलटल्यानंतर काही जणांनी हिमतीने पोहून नदीकाठ गाठला आणि आपला जीव वाचवला. प्रशासनाकडून अद्याप अधिकृत मृत्यूच्या आकड्याची पुष्टी केली जात नसून शोधमोहीम अजूनही सुरू आहे.

या भीषण अपघातावर विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, राघोपूर दियारा भागात नाव उलटल्याची अत्यंत दुर्दैवी आणि दुःखद बातमी मिळाली. बुडणाऱ्यांमध्ये बहुतांश लहान मुले आहेत. ईश्वर सर्वांना सुरक्षित ठेवू दे. स्थानिक नागरिक, प्रशासन आणि अधिकाऱ्यांशी बोलून मदत, बचाव व उपचाराच्या कामाला वेग देण्याचे निर्देश दिले आहेत.

याशिवाय बिहार काँग्रेस आणि आरएलएम (ठङच्) प्रमुख उपेंद्र कुशवाह यांनीदेखील या घटनेवर शोक व्यक्त करत मृत बालकांना श्रद्धांजली वाहिली आहे आणि शोकाकुल कुटुंबांप्रति तीव्र संवेदना व्यक्त केल्या आहेत.

# लदाख हा भारताचा अविभाज्य भाग; भारताने सुनावले खडेबोल




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लदाखमधील २८ महत्त्वाच्या भौगोलिक आणि सामरिकदृष्ट्या संवेदनशील ठिकाणांना अधिकृत व प्रमाणित नावे देण्याच्या भारताच्या निर्णयामुळे ड्रॅगनचा तिळपापड झाला आहे. भारताने भारतीय सर्वेक्षण विभागाच्या अधिकृत नकाशांमध्ये या ठिकाणांचा समावेश केल्यावर चीनने यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. मात्र, भारताने चीनचा हा विरोध फेटाळून लावत लदाख हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि या वास्तवात कोणताही बदल होऊ शकत नाही, अशी ठाम भूमिका घेतली आहे.

केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने लदाख केंद्रशासित प्रदेशाच्या प्रशासनाशी सविस्तर सल्लामसलत करून या २८ ठिकाणांची निवड केली आहे. यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे:

प्रमुख वैशिष्ट्ये: पर्वतशिखरे, खिंडी, हिमनद्या, भूप्रदेश, दऱ्या आणि जलाशय.

महत्त्वाची ठिकाणे: गोगरा, हॉट स्प्रिंग यांसारख्या सीमावर्ती भागांचाही यात समावेश आहे.

उद्देश: या ठिकाणांची अचूक ओळख निश्चित करणे, सरकारी नोंदींमध्ये एकसमानता आणणे आणि नागरिकांना या भागांविषयी अधिक स्पष्ट माहिती उपलब्ध करून देणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.

चीनचा आक्षेप आणि फुसकुळ दावे

भारताच्या या सार्वभौम निर्णयावर पोटशूळ उठलेल्या चीनने नेहमीप्रमाणे आक्रमक पवित्रा घेतला आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी बीजिंग येथे एका पत्रकार परिषदेत म्हटले की, भारत सरकारने एकतर्फी आणि बेकायदेशीरपणे स्थापन केलेला 'लदाख केंद्रशासित प्रदेश' चीन कधीही मान्यता देत नाही. चीन ज्या भूभागांवर दावा करतो, त्या भागांची स्थिती भारत बदलू शकत नाही.

भारताचे सडेतोड प्रत्युत्तर

चीनच्या या ढोबळ आणि अनाठायी आक्षेपाला भारताने कठोर शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. नवी दिल्लीने स्पष्ट केले आहे की, लदाख हा भारताचा अभिन्न अंग होता आणि नेहमीच राहील. राजकीय हेतूने केले जाणारे वारंवारचे दावे किंवा कुठल्याही प्रकारचा प्रचार यामुळे भारताच्या प्रादेशिक अखंडतेवर आणि सार्वभौमत्वावर कधीही फरक पडणार नाही. भौगोलिक नोंदी प्रमाणित करणे हा देशाचा अंतर्गत अधिकार असून चीनच्या अशा आक्षेपांना भारताकडून यापुढेही चोख प्रत्युत्तर दिले जाईल.

# राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये दसऱ्यानंतर पाऊस पडणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात यंदा अपेक्षित पाऊस पडलेला नाही. तसेच राज्यातून आता नैऋत्य मान्सूनदेखील परतला आहे. अल निनोच्या संकटामुळे राज्यात अपेक्षित पाऊस पडलेला नाही. जागतिक तापमान वाढ हे यामागचं प्रमुख कारण आहे. आता या तापमानवाढीचे चटके आता संपूर्ण जगाला सोसावे लागणार आहेत. अपेक्षित पाऊस न पडल्याने राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. असं असताना राज्यात पुढच्या काही दिवसांत अचानक वातावरणात मोठा बदल होणार असल्याची माहिती मिळत आहे. हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी राज्यात दसऱ्यानंतर पाऊस पडणार असल्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच राज्याच्या हवामान विभागाकडूनही दसऱ्याच्याआधीच काही जिल्ह्यांमध्ये पाऊस पडणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

राज्यात १७ ऑक्टोबरपर्यंत कोरडे वातावरण राहणार आहे. पण यानंतर १८ ऑक्टोबरला वातावरणात बदल होणार आहे. दसरा झाल्यानंतर २० ते २५ ऑक्टोबर दरम्यान परतीचा पाऊस पडणार आहे. या परतीच्या पावसाने शेतकऱ्याची रब्बीची पेरणी होणार आहे. पण हा पाऊस सर्वदूर पडणार नाही. तो काही ठिकाणी पडेल तर काही ठिकाणी पडणार नाही. काही ठिकाणी रिमझिम पडेल. तर कुठे जोरात पडेल, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

जोपर्यंत धुकं पडत नाही तोपर्यंत राज्यातून पाऊस निघून गेलेला नाही. महाराष्ट्राच्या दक्षिण भागात चांगला पाऊस पडणार आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर, धाराशिव, लातूर, सोलापूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, वाशिंद, जालना, छत्रपती संभाजीनगर या पट्ट्यात पावसाचं स्वरुप जास्त असणार आहे. परतीचा हा पाऊस उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातही पडेल. पण तिथ सर्वदूर नाही तर काही ठिकाणीच पडेल, असा दावा पंजाबराव डख यांनी केला आहे.

हवामान विभागाने वर्तवल्यानुसार, राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, येत्या १५ ऑक्टोबरला कोल्हापूर जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. जिल्ह्यातील घाट परिसरातही वादळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. या काळात वाऱ्याचा वेग हा ३० ते ४० किमी प्रतितास असण्याची शक्यता आहे.

१६ तारखेला ७ तर १७ तारखेला ११ जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा

राज्यात येत्या १६ तारखेला सात जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. यामध्ये सिंधुदुर्ग, पुणे, पुणे घाट परिसर, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, कोल्हापूर, सातारा, सातारा घाट परिसर, सांगली, सोलापूर, धाराशिव या जिल्ह्यांचा समावेश आहे. यानंतर १७ ऑक्टोबरला ११ जिल्ह्यांमध्ये पाऊस पडू शकतो, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामध्ये धाराशिव, लातूर, नांदेड, सोलापूर, सांगली, सातारा, सातारा घाट परिसर, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, पुणे, पुणे घाट परिसर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या जिल्ह्यांचा समावेश आहे.

पुढच्या दोन दिवसांसाठी काही जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा

दरम्यान, हवामान विभागाकडून राज्यातील तीन ते चार जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाकडून १४ ऑक्टोबरसाठी ठाणे, मुंबई, रायगड या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर १५ ऑक्टोबरला ठाणे, मुंबई, रायगड, रत्निगिरी या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त मध्य रेल्वे चालवणार २४ विशेष गाड्या




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय इतिहासात १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारलेला दिवस म्हणजेच 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' अत्यंत श्रद्धा आणि उत्साहाने साजरा केला जातो. या ऐतिहासिक दिनानिमित्त नागपूरच्या दीक्षाभूमीवर दरवर्षी देशभरातून करोडो अनुयायी अभिवादन करण्यासाठी दाखल होतात. या काळात अनुयायांना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि प्रवास सुकर व्हावा, म्हणून मध्य रेल्वे प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. रेल्वेने नागपूरसाठी २४ विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे.

प्रमुख वैशिष्ट्ये आणि गाड्यांचे मार्ग

प्रवाशांच्या वाढत्या गर्दीला लक्षात घेता मध्य रेल्वेने मुंबई, पुणे, सोलापूर, नाशिक, अकोला आणि भुसावळ येथून नागपूरसाठी विशेष गाड्यांचे नियोजन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने आरक्षित आणि अनारक्षित अशा दोन्ही प्रकारच्या गाड्यांचा समावेश आहे:

१. नागपूर - अकोला - नागपूर विशेष गाड्या (४ फेऱ्या): या गाड्या २०, २१ आणि २२ ऑक्टोबर २०२६ दरम्यान धावतील. यामध्ये वातानुकूलित आणि शयनयान (स्लीपर) श्रेणीची सोय उपलब्ध असून, याचे आरक्षण IRCTC संकेतस्थळावर किंवा संगणकीकृत केंद्रांवर करता येईल.

२. मुंबई (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) - नागपूर अनारक्षित विशेष गाड्या (६ फेऱ्या): मुंबईतून नागपूरसाठी १८, १९ आणि २१ ऑक्टोबरला विशेष गाड्या सुटणार आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड ते भुसावळमार्गे या गाड्या धावतील.

३. पुणे - नागपूर - पुणे अनारक्षित विशेष गाड्या (४ फेऱ्या): पुण्याहून १९ आणि २१ ऑक्टोबरला गाडी सुटून नागपूरला पोहोचेल, तर परतीची गाडी नागपूरहून २० आणि २२ ऑक्टोबरला सुटणार आहे.

४. सोलापूर - नागपूर - सोलापूर अनारक्षित विशेष गाडी (२ फेऱ्या): सोलापूरहून १९ ऑक्टोबरला सुटणारी ही विशेष गाडी कुर्डुवाडी, दौंड, अहिल्यानगर मार्गे नागपूरला जाईल.

५. नागपूर - भुसावळ - नागपूर अनारक्षित विशेष गाड्या (४ फेऱ्या): २० आणि २१ऑक्टोबरला ही विशेष सेवा उपलब्ध असणार आहे.

६. नाशिक रोड - नागपूर - नाशिक रोड मेमू अनारक्षित विशेष गाड्या (४ फेऱ्या): १८ ते २१ ऑक्टोबर दरम्यान नाशिकहून सुटणाऱ्या या मेमू विशेष गाड्यांचा लाभ परिसरातील प्रवाशांना घेता येईल.

प्रवाशांसाठी महत्त्वाच्या सूचना

तिकीट बुकिंग: अनारक्षित डब्यांचे तिकीट काढण्यासाठी प्रवासी सामान्य दरांसह 'युटीएस' प्रणाली किंवा 'रेलवन' ॲपचा वापर करू शकतात.

अतिरिक्त सोयी: नागपूरमधील अजनी व मुख्य रेल्वे स्थानकांवर प्रवाशांच्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी अतिरिक्त तिकीट काऊंटर्स सुरू करण्यात आले आहेत.

वेळापत्रक : आपल्या प्रवासाची अचूक वेळ आणि थांब्यांची सविस्तर माहिती मिळवण्यासाठी प्रवाशांनी www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा NTES ॲप डाऊनलोड करावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतरच विविध गटांचे राजकीय गणित अधिक स्पष्ट होणार**

# डीसीसी बँक निवडणूक: सुभाष देशमुखांच्या १३ संस्थांवरील हरकती फेटाळल्या; निवडणुकीत कोणाला फायदा?



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांच्या ठरावांवर आमदार सुभाष देशमुख यांच्यासह त्यांच्या समर्थकांनी घेतलेल्या हरकती सहकार विभागाने फेटाळल्या आहेत. आमदार देशमुख यांनी स्वतः १३ विकास संस्थांच्या ठरावांवर हरकती घेतल्या होत्या. मात्र, विभागीय सहनिबंधक दिग्विजय आहेर यांनी या हरकती फेटाळल्याने संबंधित संस्थांची नावे मतदार यादीत कायम राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे माजी संचालक सुरेश हसापुरे यांच्या गटाला दिलासा मिळाला आहे.

नेमक्या कोणत्या हरकती होत्या?

संबंधित संस्थांच्या ठरावांवर हरकत घेताना काही मतदार संबंधित गावाचे रहिवासी नसल्याचे, त्यांच्या नावावर शेतजमीन नसल्याचे, तसेच ते संबंधित सोसायटीचे सभासद किंवा कर्जदार नसल्याचे मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. काही व्यक्ती कर्नाटकातील रहिवासी असल्याचाही आक्षेप घेण्यात आला होता. मात्र, विभागीय सहनिबंधकांनी या हरकती फेटाळल्या आहेत.

सुभाष देशमुखांना किती फटका?

या निर्णयामुळे आमदार सुभाष देशमुख यांच्या गटाला अपेक्षित असलेल्या काही संस्थांची नावे मतदार यादीतून वगळली गेलेली नाहीत. त्यामुळे या संस्थांशी संबंधित मतदारांचा निवडणुकीतील सहभाग कायम राहू शकतो. दुसरीकडे, या निर्णयाने सुरेश हसापुरे यांच्या गटाला दिलासा मिळाला आहे.

मात्र, या निर्णयामुळे सुभाष देशमुख यांना नेमका किती राजकीय किंवा मतांचा फटका बसेल, हे सध्या निश्चित सांगता येणार नाही. संबंधित संस्थांचे अधिकृत मतदार, मतदानाचा कल आणि इतर गटांची ताकद यावर प्रत्यक्ष परिणाम अवलंबून असेल. त्यामुळे या निर्णयाकडे डीसीसी बँकेच्या निवडणुकीतील महत्त्वाची घडामोड म्हणून पाहिले जात आहे.

अंतिम मतदार यादीकडे लक्ष

डीसीसी बँकेच्या प्रारूप मतदार यादीवर एकूण ३५५ हरकती दाखल झाल्या होत्या. त्यापैकी १८७ हरकतींचे निर्णय जिल्हा उपनिबंधक कार्यालयाला मिळाले होते, तर उर्वरित १६८ निर्णयांची प्रतीक्षा होती. १४ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर होणार असल्याने आता कोणत्या संस्था आणि मतदार यादीत कायम राहतात, याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतरच डीसीसी बँकेच्या निवडणुकीतील विविध गटांचे राजकीय गणित अधिक स्पष्ट होणार आहे.

## संपादकीय....

### परतीचा पाऊस

महाराष्ट्रात यंदा अपेक्षित पाऊस पडलेला नाही. तसेच राज्यातून आता नैऋत्य मान्सूनदेखील परतला आहे. अल निनोच्या संकटामुळे राज्यात अपेक्षित पाऊस पडलेला नाही. जागतिक तापमान वाढ हे यामागचं प्रमुख कारण आहे. आता या तापमानवाढीचे चटके आता संपूर्ण जगाला सोसावे लागणार आहेत. अपेक्षित पाऊस न पडल्याने राज्यात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. असं असताना राज्यात पुढच्या काही दिवसांत अचानक वातावरणात मोठा बदल होणार असल्याची माहिती मिळत आहे. हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी राज्यात दसऱ्यानंतर पाऊस पडणार असल्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच राज्याच्या हवामान विभागाकडूनही दसऱ्याच्याआधीच काही जिल्ह्यांमध्ये पाऊस पडणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. राज्यात १७ ऑक्टोबरपर्यंत कोरडे वातावरण राहणार आहे. पण यानंतर १८ ऑक्टोबरला वातावरणात बदल होणार आहे. दसरा झाल्यानंतर २० ते २५ ऑक्टोबर दरम्यान परतीचा पाऊस पडणार आहे. या परतीच्या पावसाने शेतकऱ्याची रब्बीची पेरणी होणार आहे. पण हा पाऊस सर्वदूर पडणार नाही. तो काही ठिकाणी पडेल तर काही ठिकाणी पडणार नाही. काही ठिकाणी रिमझिम पडेल. तर कुठे जोरात पडेल, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. जोपर्यंत धुकं पडत नाही तोपर्यंत राज्यातून पाऊस निघून गेलेला नाही. महाराष्ट्राच्या दक्षिण भागात चांगला पाऊस पडणार आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे, अहिल्यानगर, धाराशिव, लातूर, सोलापूर, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, यवतमाळ, वाशिंद, जालना, छत्रपती संभाजीनगर या पट्ट्यात पावसाचं स्वरुप जास्त असणार आहे.

# 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानासाठी मंगळवेढ्यात तालुकास्तरीय प्रशिक्षण

## गावोगावी आरोग्यविषयक निर्देशांक सुधारण्याचा निर्धार; विविध विभागांचा सहभाग महत्त्वाचा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगळवेढा, दि. १३ ऑक्टोबर : तालुक्यातील प्रत्येक गाव आरोग्यदृष्ट्या सक्षम व संपन्न करण्याच्या उद्देशाने पंचायत समिती मंगळवेढा येथे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत तालुकास्तरीय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणात विविध विभागांचे अधिकारी, आरोग्य कर्मचारी आणि आरोग्य पथकांनी सहभाग घेत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्धार व्यक्त केला.




या प्रशिक्षणास जिल्हा आरोग्य अधिकारी मा. डॉ. सतीश कोपूरवाड, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी मा. डॉ. नांदकिशोर घाडगे आणि माता व बालसंगोपन अधिकारी मा. डॉ. हर्षल जाधव यांचे मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी मंगळवेढा मा. डॉ. भाऊसाहेब जानकर व तालुकास्तरीय प्रशिक्षकांनी अभियानाचे उद्दिष्ट, कार्यपद्धती आणि अंमलबजावणी याबाबत मार्गदर्शन करुन प्रशिक्षण घेतले.

प्रशिक्षणादरम्यान गावातील आरोग्यविषयक समस्या ओळखणे, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा बळकट करणे, आरोग्यविषयक निर्देशांकांमध्ये सुधारणा घडवून आणणे तसेच ग्राम पंचायत, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि महिला व बालविकास विभाग यांच्या समन्वयातून गावाचा सर्वांगीण आरोग्यविकास साधणे, या बाबींवर भर देण्यात आला. अभियानांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती व आरोग्य संस्थांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची माहितीही देण्यात आली.

तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या पथकांनी अभियानाच्या अंमलबजावणीसंदर्भात गटचर्चा व कृती आराखड्यांचे सादरीकरण केले. गावपातळीवर नियोजन, आरोग्यविषयक उपक्रमांची अंमलबजावणी आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील, यावर यावेळी चर्चा झाली.

या प्रशिक्षणास गटविकास अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक व सहायिका, आरोग्य सेवक व सेविका तसेच गटप्रवर्तक उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य आरोग्य विभागाच्या सूचनांनुसार मंगळवेढा तालुक्यात हे अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. तालुक्यातील सर्व पदाधिकारी, प्रतिनिधी, प्रत्येक गावातील सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, नागरिक, तरुण मंडळे महिला बचत गट आणि शिक्षण, एकात्मिक बालविकास प्रकल्प विभाग व इतर विविध शासकीय विभागांनी सक्रिय सहभाग घेऊन गाव आरोग्य संपन्न करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मा. डॉ. भाऊसाहेब जानकर तालुका आरोग्य अधिकारी मंगळवेढा यांनी यावेळी केले.

# जिथे बार्शी, तिथे सरशी; बार्शी तालुक्यात ज्ञानयात्री डॉ.बी.पी. रोंगे सरांना भरघोस प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्शी– राज्यातील शिक्षक मतदार संघाची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर तंत्रशिक्षणातील विविध यशस्वी उपक्रमांमुळे राज्यात 'ज्ञानयात्री' म्हणून ओळख निर्माण झालेले डॉ. बी. पी. रोंगे सर हे बार्शी तालुक्यातील शिक्षकांशी थेट संवाद साधत आहेत. विशेष म्हणजे त्यांच्या भेटींना शिक्षकांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. साधारण दिड वर्षभरापासून डॉ. बी.पी.रोंगे सरांनी पुणे विभागात असणाऱ्या पाचही जिल्ह्यांतील शाळा–महाविद्यालयांना व पदाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटी देवून तेथील समस्या जाणून घेतल्या आहेत. ज्याप्रमाणे स्वेरीतील विद्यार्थ्यांचे करिअर उज्वल होत आहे त्याचप्रमाणे ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांचे भविष्यही उज्वल झाले पाहिजे. डॉ. रोंगे सरांच्या रूपाने पुणे विभागाला अभ्यासू आमदार मिळणार असल्याची भावना सर्वत्र निर्माण झाली आहे. यावेळी विभागातील शिक्षकांनी डॉ. रोंगे सरांना विजयी करण्याचा विडा उचलला आहे, हेच वाढत्या प्रतिसादावरून दिसून येते.




गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरी अर्थात श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूटचे संस्थापक, स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष डॉ. बब्रुवाहन पांडुरंग रोंगे हे शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवर लक्ष केंद्रित करत असल्याचे पहायला मिळत आहे. यनिमित्ताने सर्वत्र डॉ. रोंगे सरांचे भव्य स्वागत केले जात आहे. प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी शिक्षकांच्या प्रत्यक्ष भेटीच्या रूपाने प्रचारात मात्र कमालीची आघाडी घेतली असल्याचे स्पष्ट होत आहे. स्वेरीच्या स्थापनेपासून डॉ. रोंगे सरांची मुद्देसूद आणि व्यवस्थित मांडणी, प्रत्येक समस्येचा सुक्ष्म अभ्यास या धोरणांमुळे डॉ. रोंगे सरांच्या तंत्रशुद्ध अभ्यासाचा आता राज्याला फायदा होणार आहे. एकूणच डॉ. रोंगे सरांकडे शैक्षणिक क्षेत्रातील दिग्गज मंडळीचे लक्ष लागले आहे तसेच त्यांना पाचही जिल्ह्यांतील ५८ तालुक्यांतील शिक्षकांचा भक्कम प्रतिसाद मिळत आहे. मागील वर्षभरापासून सुरू झालेल्या या काळात प्राचार्य डॉ. रोंगे सरांचे पाचही जिल्ह्यांत झंझावाती दौरे सुरु असून त्यांना सर्वत्र उस्फुर्तपणे प्रतिसाद लाभत आहे. मतदार नोंदणी पासून निवडणूकीच्या सर्व प्रक्रिया याबाबत डॉ. रोंगे सर प्रत्येक शाळेत, प्रत्येक शिक्षकांना, संस्थाचालकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भेट देवून चर्चा करत आहेत. या चर्चांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये अनेक शिक्षक संघटनांनी व पदाधिकाऱ्यांनी डॉ. रोंगे सरांना पाठिंबा दर्शविला आहे. एकूणच डॉ.रोंगे सर यांच्या स्वेरी, एसव्हीआयटी आणि स्वाईप या तिन्ही संस्थांना अल्पावधित मिळालेल्या यशामुळे शिक्षकांची अपेक्षा वाढली आहे. या पार्श्वभूमीवर बार्शी तालुक्यातील शाळा–महाविद्यालयांना भेटी देऊन डॉ. रोंगे सरांनी आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी यावेळी जय जगदंबा सर्जापूर या संस्थेचे अध्यक्ष डॉ. कपिल कोरके यांची भेट घेतली. डॉ रोंगे सरांनी शेळगाव ज्युनिअर कॉलेज शेळगाव, जनाबाई जाधव प्रशाला राळेरास, अर्णव शैक्षणिक संकुल वैराग इतर शाळा व महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील समस्या जाणून घेतल्या. या भेटी दरम्यान बोलताना ज्ञानयात्री डॉ.बी.पी. रोंगे सर म्हणाले की 'आज शिक्षकांसमोर अनेक प्रश्न, अडचणी व समस्या आहेत. त्या सर्व शासन पातळीवर अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडण्यासाठी मी कटिबद्ध आहे. टीईटी, जुनी पेन्शन योजना अशा अनेक समस्या आहेत, त्यांचा मी बारकाईने अभ्यास केला आहे. खरे पाहता हे प्रश्न फार पूर्वी सुटायला हवे होते परंतु उदासीनतेमुळे ते सुटलेले नाहीत. यासाठी जर आपण सेवा करण्याची संधी दिली तर जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक प्रयत्न करून अनुत्तरीत प्रश्न सोडविण्यासाठी कोठेही कमी पडणार नाही.' अशी ग्वाही त्यांनी दिली. या कारणांमुळे सर्वत्र ज्ञायात्री डॉ. रोंगे सरांना भरघोस प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट होते. आमदार होण्यापूर्वीच सरांनी कांही प्रश्न सोडविले आहेत. त्यामुळे डॉ. रोंगे सरांकडे पुणे विभागातील शिक्षक आशेने पाहत आहेत, हे मात्र नक्की जाणवते.

# कर्तव्यतत्परतेतून माणुसकीचे दर्शन!; वागदरीचे सुपुत्र दीपक भिमपुरे यांचा सोलापूर पोलीस अधीक्षकांकडून प्रशस्तीपत्र देऊन गौरव



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : कर्तव्य बजावत असताना सामाजिक बांधिलकी जपत माणुसकीचे दर्शन घडविणारे वागदरी गावचे सुपुत्र तथा सोलापूर शहर वाहतूक पोलीस विभागात कार्यरत असलेले श्री. दीपक भिमपुरे यांनी आपल्या तत्परतेतून कौतुकास्पद कामगिरी केली आहे. रस्त्यावर अपघात झालेल्या एका महिलेला तातडीने उपचार मिळावेत, या उद्देशाने त्यांनी त्वरित मदत करत महिलेला दवाखान्यात दाखल केले. त्यांच्या या संवेदनशील आणि कर्तव्यदक्ष कार्याची दखल घेत सोलापूर पोलीस अधीक्षक यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

वाहतूक पोलीस म्हणून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत ठेवणे, नागरिकांची सुरक्षितता जपणे आणि वाहतुकीचे नियम पाळले जातील याची दक्षता घेणे, अशी महत्त्वाची जबाबदारी पोलिसांवर असते. मात्र, कर्तव्य बजावत असताना एखाद्या अपघातग्रस्त व्यक्तीला तातडीने मदत करणे, हीदेखील माणुसकीची महत्त्वाची जबाबदारी आहे. दीपक भिमपुरे यांनी ही जाणीव ठेवून अपघातग्रस्त महिलेला त्वरित वैद्यकीय मदत मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला. अपघाताच्या प्रसंगी वेळेवर मदत मिळणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशा वेळी तत्परतेने मदतीचा हात पुढे केल्यामुळे संबंधित व्यक्तीला उपचार मिळण्यास मदत होते. भिमपुरे यांनी दाखविलेली तत्परता ही केवळ पोलीस कर्मचाऱ्याची कर्तव्यनिष्ठा नसून समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचेही प्रतीक आहे. त्यांच्या या विशेष कामगिरीची दखल घेऊन सोलापूर पोलीस अधीक्षकांकडून प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आल्याने वागदरी गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या कार्यामुळे पोलीस दलातील कर्तव्यनिष्ठा, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. दीपक भिमपुरे यांची ही कामगिरी समाजातील प्रत्येकासाठी प्रेरणादायी असून, संकटाच्या वेळी माणुसकीने मदतीसाठी धावून जाण्याचा संदेश देणारी आहे. त्यांच्या या कौतुकास्पद कार्याबद्दल वागदरी परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती आयोजित नवरात्र संगीत महोत्सवाची भक्तिमय वातावरणात उत्साहात सुरुवात

# कृष्णराज लवेकर आणि ज्योती गोराणे यांच्या सुरेल स्वरांची पहिली माळ रुक्मिणी मातेच्या चरणी अर्पण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पंढरपूर : श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने आयोजित श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवाला सोमवारी भक्तिमय वातावरणात उत्साहात प्रारंभ झाला. परभणी येथील गायक कृष्णराज लवेकर आणि गायिका ज्योती गोराणे यांनी आपल्या सुरेल स्वरांतून सादर केलेले अभंग, गवळणी आणि भक्तिगीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. या दोन्ही कलाकारांच्या सुरेल गायनातून नवरात्र महोत्सवातील पहिली स्वरमाळ श्री रुक्मिणी मातेच्या चरणी अर्पण करण्यात आली.

मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव आणि व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्या मार्गदर्शनाखाली या संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाच्या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाची सुरुवात सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, नगराध्यक्षा तथा समिती सदस्या डॉ. प्रणिती भालके, सदस्या शकुंतला नडगिरे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश आणेचा आणि उपस्थित मान्यवर कलाकारांच्या हस्ते विठुरायाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी मंदिर समितीच्या वतीने उपस्थित कलाकारांचा सन्मान करण्यात आला.




महोत्सवाच्या पहिल्या सत्रात परभणी येथील गायक कृष्णराज लवेकर यांनी आपल्या सुरेल, भावपूर्ण आणि भक्तिरसाने ओतप्रोत गायनाने कार्यक्रमात रंगत आणली. वारकरी संप्रदायाचा भक्तिमय बीजमंत्र असलेल्या 'जय जय राम कृष्ण हरी' या नामघोषाने त्यांनी गायनाला सुरुवात केली. त्यानंतर 'रूप पाहता लोचनी', 'सुंदर ते ध्यान', 'विठुराया माझा आनंदाचा कंद', 'देवा तुझा मी सोनार' आणि 'जातो माघारी पंढरीनाथा' यांसारखे लोकप्रिय अभंग सादर करून त्यांनी विठ्ठलभक्तीचा सुरेल आविष्कार घडविला. त्यांच्या गायनातील भावपूर्णता, सुरांची सहजता आणि अभंगांमधील भक्तिभाव यामुळे उपस्थित रसिकांना अविस्मरणीय संगीतानुभव मिळाला.

दुसऱ्या सत्रात गायिका ज्योती गोराणे यांनी आपल्या मधुर स्वरांनी संगीत मैफलीत भक्तिरसाची रंगत वाढविली. 'जय जय राम कृष्ण हरी' या नाम घोषानंतर त्यांनी 'अवचित परिमळू', 'भाग्यदा लक्ष्मी बारम्मा' आणि 'पाहिला नंदाचा नंदन' यांसह विविध अभंग आणि गवळणी सादर केल्या. भक्तिगीतांच्या सुमधुर सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दोन्ही सत्रांतील गायनाने नवरात्र महोत्सवाची सुरुवात सुरेल आणि भक्तिमय झाली.

या संगीत मैफलीला निवेदनाची साथ उमेश बागडे यांनी दिली. शाम गोराणे, सोहम गोराणे, अविनाश पवार, विश्वास कळमकर, सुधांशू धाबेकर, साई चाणक्य, गणेश ऐबेकर, शोभा कदम, विश्वेश्वर कोळंबीकर, मंगेश जवळेकर आणि हरिप्रसाद पांडे यांनी विविध वाद्यांच्या माध्यमातून सुरेल साथसंगत केली. त्यांच्या संगीतसाथीमुळे दोन्ही कलाकारांच्या गायनाला अधिक उठाव मिळाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ज्ञानेश्वर दुधाणे यांनी केले.

श्री रुक्मिणी नवरात्र संगीत महोत्सवाच्या माध्यमातून शास्त्रीय संगीत, भक्तिगीते, अभंग आणि वारकरी संगीतपरंपरेचा सुरेल संगम रसिकांना अनुभवता येणार आहे. पुढील सात दिवस महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक आणि गायिका आपल्या गायनसेवेने विठुरायाच्या चरणी स्वरांची सेवा अर्पण करणार आहेत. या संगीत महोत्सवाचा लाभ पंढरपूरकरांसह भाविक आणि संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# साडेचार लाखांचा शासकीय निधी, तरीही समतानगरची ई-लायब्ररी धूळखात पडून



## जबाबदार कोण? समतानगरमधील नागरिकांची नाराजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायतीच्या हद्दीतील समतानगर बौद्ध वस्तीत विद्यार्थ्यांना वाचन, अभ्यास आणि डिजिटल शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने सन २०२४ मध्ये शासनाकडून ई-लायब्ररीसाठी ४ लाख ५० हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेली ही ई-लायब्ररी गेल्या दोन वर्षांपासून बंद असून, तिच्या प्रवेशद्वाराला कुलूप असल्याचे चित्र असून ई-लायब्ररी धूळखात पडून आहे.

माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार, पुस्तके, फर्निचर, टीव्ही खरेदीसाठी ३ लाख रुपये खर्च केल्याची नोंद ग्रामपंचायतीच्या सामान्य रोकडवहीत आहे. मात्र, प्रत्यक्षात खरेदी केलेले साहित्य सध्या ई-लायब्ररीत उपलब्ध आहे का, तसेच मंजूर निधीतील उर्वरित रकमेचा विनियोग कसा करण्यात आला, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेषतः १ लाख १२ हजार ६३२ रुपयांच्या रकमेची बिले उपलब्ध नसल्याची बाब समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सन १९९६ मध्ये समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून समतानगर येथे समाजमंदिर बांधण्यात आले होते. कालांतराने या समाजमंदिरात युवकांसाठी व्यायामशाळा सुरू करण्यात आली होती. याच ठिकाणी ई-लायब्ररी सुरू करण्याचा निर्णय नेमका कधी घेण्यात आला. याबाबत समतानगर येथील नागरिकांना कोणत्याही प्रकारे विश्वासात न घेता ई-लायब्ररी कधी मंजूर करण्यात आली? आणि त्यासाठी कोणती प्रशासकीय प्रक्रिया राबविण्यात आली, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. ई-लायब्ररी उभारण्याचा उद्देश विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावणे, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मदत करणे आणि आधुनिक शैक्षणिक साधने उपलब्ध करून देणे हा होता. मात्र, ही सुविधा बंद असल्याने विद्यार्थ्यांना तिचा लाभ घेता येत नाही. ई-लायब्ररीची देखभाल कोणाकडे आहे, तेथील पुस्तके, फर्निचर आणि टीव्ही संचाची सद्यस्थिती काय आहे, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. संबंधित खर्चाची मूळ कागदपत्रे, खरेदी आदेश, देयकांच्या नोंदी आणि प्रत्यक्ष साहित्याची तपासणी केल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे संबंधित यंत्रणेने संपूर्ण आर्थिक व्यवहाराची निष्पक्ष पडताळणी करणे गरजेचे आहे. समतानगरमधील ई-लायब्ररी गेल्या दोन वर्षांपासून बंद असल्याने तेथील शैक्षणिक साहित्याची तपासणी करून ई-लायब्ररी पुन्हा सुरू करावी, अशी मागणी पत्रकार मिलिंद जाधव यांनी ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे. आता संबंधित प्रशासन या प्रकरणाची चौकशी करून विद्यार्थ्यांसाठी ई-लायब्ररी पुन्हा सुरू करण्यासाठी कोणती पावले उचलणार का? याकडे समतानगरमधील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# 'सेवा संकल्प' अंतर्गत निफाडमध्ये नगरपंचायतीतर्फे भजन, अभंग व भक्तिगीत स्पर्धा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शारदीय नवरात्र उत्सव निमित्त निफाड नगरपंचायतीच्या वतीने आयोजित नवरात्र महिला महोत्सव - नारीशक्तीचा उत्सव अंतर्गत भजन, अभंग व भक्तिगीत स्पर्धा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाली.

सदर स्पर्धेमध्ये महिला व पुरुष स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या सुमधुर आवाजातून विविध भजने, संतांचे अभंग व भक्तिगीतांचे सादरीकरण केले. स्पर्धेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, संतपरंपरा व भक्तिसंगीताचा वारसा जतन करण्यासोबतच महिलांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. स्पर्धेदरम्यान उपस्थितांनी भक्तिरसपूर्ण सादरीकरणाचा आनंद घेतला.

निफाड नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा सौ. अलका निकम, उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे, , मुख्याधिकारी धीरज भामरे, सभापती साहेबराव बर्डे नगरसेवक नगरसेविका यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे, महिला सक्षमीकरणाला चालना देणे आणि सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे या उद्देशाने निफाड नगरपंचायतीमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. अशा उपक्रमांमुळे महिलांना आपली कला सादर करण्याची संधी मिळत असून सांस्कृतिक परंपरांचे संवर्धन होण्यास मदत होत आहे.

# उज्ज्वला फूड्सच्या आयुर्वेदिक फूडस् प्रॉडक्टचा उद्घाटन सोहळा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मंगरूळपीर/प्रतिनिधी



मंगरूळपीर शहरांमध्ये उज्वला फूड्स कंपनीचे एक जबरदस्त आयुर्वेदिक मुखवास एस जे शॉपीच्या संचालक सुनिता वाघमारे मॅडम यांनी आणले आहे. ज्याचं नाव आहे मूळ इनाम सर या प्रॉडक्ट उद्घाटनाचा सोहळा खाडे हॉल मंगरूळपीर जाम रोड येथे साजरा करण्यात आला. या आयुर्वेदिक उपवास मुळे बऱ्याच महिलांना रोजगार मिळणार आहे आणि या मुखवास मुळे भारत स्वच्छ पण होणार आहे कारण हे प्रॉडक्ट खाऊन थुकणे नसल्यामुळे स्वच्छता होणार आहे आणि या प्रॉडक्टचे आरोग्यास पण खूप फायदे आहेत असे उज्वला फूड्स कंपनीच्या महाराष्ट्र लवे मोहोड मॅडम यांनी आपल्या भाषणांमधून सांगितले. त्याचबरोबर मंगरूळपीरचे नगराध्यक्ष अशोक परळीकर साहेब यांनी पण महिलांनी हे प्रॉडक्ट मंगरूळपीर मध्ये आणल्याबद्दल त्यांचे खूप खूप अभिनंदन केले आणि तुमचा हा व्यवसाय खूप मोठा हो यासाठी मी तुमच्या पाठीशी आहे, असे महिलांना आश्वासन दिले आणि पानपट्टी आणि किराणा दुकान दारांना या प्रॉडक्ट मुळे खूप चांगला नफा पण मिळणार आहे आणि हे प्रॉडक्ट आरोग्यासाठी खूप चांगले चांगले असल्यामुळे सर्वांनी ते प्रॉडक्ट आपल्या दुकानवर पानपट्टीवर मेडिकल वर ठेवायला पाहिजे असे आवाहन परडी साहेब यांनी समस्त मंगरूळपीर तालुक्यामधील पानपट्टी वाले आणि किराणा दुकानांना आवाहन केले.

# उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : समाजासाठी, आरोग्यासाठी आणि जीवनासाठी 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित एकूण २७ रक्तपिशव्यांचे संकलन केले.

रक्तदान हे श्रेष्ठ सामाजिक कार्य असून, रक्तदानामुळे गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होऊन त्यांचे प्राण वाचविण्यास मदत होते. याच सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे. रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले होते.




या रक्तदान शिबिराचे आयोजन उपजिल्हा रुग्णालय निफाड यांच्या वतीने करण्यात आले होते. तसेच मेट्रो ब्लड सेंटर, सिव्हिल हॉस्पिटल, नाशिक यांचे सहकार्य लाभले. शिबिरात रक्तदात्यांनी सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून रक्तदान केले. या उपक्रमातून एकूण २७ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.

याशिबिराबाबत उपजिल्हा रुग्णालय निफाड येथील कार्यरत वैद्यकीय अधिक्षक डॉ राजीव तांभाळे यांनी माहिती देताना सांगितले की, रक्ताची गरज अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, प्रसूतीदरम्यान रक्ताची आवश्यकता असणाऱ्या माता तसेच विविध आजारांमुळे रक्ताची गरज भासणाऱ्या रुग्णांना असते. त्यामुळे नियमित रक्तदान करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक निरोगी व्यक्तीने रक्तदानासाठी पुढाकार घेतल्यास अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते. 'रक्तदान हेच खरे महादान' हा संदेश देणाऱ्या या उपक्रमाच्या माध्यमातून समाजामध्ये रक्तदानाविषयी जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. रक्तदानासाठी पुढाकार घेणाऱ्या सर्व रक्तदात्यांचे तसेच या शिबिराच्या आयोजनासाठी रुग्ण कल्याण सहनियंत्रण समिती सदस्य मधुकर शेलार, सागर कुंदे, दिलीप कापसे व सुवर्णा लुकंड यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याने उपजिल्हा रुग्णालय निफाडच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

आपल्या रक्ताचा प्रत्येक थेंब एखाद्याच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण करू शकतो. याप्रमाणे कनिष्ठ लिपीक दिंगबर चरापले व संदीप राऊत यांनी सदरील शिबिर यशस्वी करण्याकरिता विशेष परिश्रम घेतले आहे.

# विजय सोमवंशी यांना उस भूषण कार्य गौरव पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील सुंदरपूर येथील प्रयोगशील व प्रगतिशील शेतकरी विजय बाळासाहेब सोमवंशी यांना महाराष्ट्र राज्य उस उत्पादक संघाचा उस भूषण कार्य गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे.

शेती क्षेत्रातील अनेक आव्हानांचा सामना करीत उस उत्पादन वाढीसाठी तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन प्रयोग करणारा शेतकरी म्हणून सुंदरपूर व पंचक्रोशीत त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.आपल्या ज्ञानाचा फायदा इतर शेतकऱ्यांना व्हावा म्हणून त्यांनी अनेक उस उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले आहे. सध्याच्या काळातील प्रतिकूल परिस्थितीत जिद्द चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर केलेल्या नियोजनामुळे अधिक ऊस उत्पादन घेऊन ते या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.



उस भूषण कार्य गौरव पुरस्काराचे वितरण १५ आक्टोंबर रोजी ओझर तालुका जुन्नर जिल्हा पुणे येथील कार्यक्रमात होणार आहे सदर पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल निफाडचे आमदार दिलीपकाका बनकर, आमदार गोकुळभाऊ गीते, माजी आमदार अनिल आण्णा कदम , राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.)चे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय पाटील, निफाडचे उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र डोखळे,दुध संघाचे माजी अध्यक्ष शिवाजीराव ढेपले, न्या.रानडे विद्या प्रसारक मंडळाचे सचिव रतनतात्या वडघुले,माजी पंचायत समिती सदस्य भैय्यासाहेब देशमुख आदिंनी अभिनंदन केले आहे.

# पांगरी काटे येथील पत्रकार समाधान सरकटे यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार २०२७ जाहीर

**दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

लोकसेवा शिक्षण व क्रीडा बहुउद्देशीय संस्था, मारुतीपेठ, ता. मेहकर, जि. बुलढाणा (नोंदणी क्र. १०७/२६) व दैनिक न्यायहक्क समताशाही व साप्ताहिक जांनेफळ एक्सप्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरस्कार सोहळा २०२७ मध्ये राज्यस्तरीय पुरस्कारासाठी पांगरी काटे येथील पत्रकार मा. समाधान रामकृष्ण सरकटे रा. पांगरी काटे, पो. बडगाव माळी, ता. सिंदखेडराजा, जि. बुलढाणा यांची निवड झाली आहे.

संस्थेचे मुख्य संपादक अशोक भाऊ शेजूळ व पुरस्कार निवड समितीचे अनिल भगवान चव्हाण (इउ) लेखक, कवी व शिक्षक यांनी जा. क्र. ७, दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी हे निवडपत्र प्रदान करून आदर्श पत्रकार पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान देत आहात. आपल्या कार्याचा आढावा व माहितीचे काळजीपूर्वक परीक्षण केल्यानंतर 'राज्यस्तरीय न्यायहक्क समताशाही आदर्श पत्रकारिता पुरस्कार २०२७' साठी आपली निवड करण्यात येत असल्याचे निवडपत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे.हा पुरस्कार सोहळा जानेवारी २०२७ मध्ये मेहकर, जि. बुलढाणा येथे वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात येणार आहे.यांच्या निवडीबद्दल समाधान सरकटे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून पत्रकारिता क्षेत्रात ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे.

## 'सृजनरंग स्पर्धा २०२६' जिल्हास्तरीय सांस्कृतिक व साहित्यिक महोत्सवाचे उत्साहात आणि दिमाखात उद्घाटन

# कला आणि साहित्यातून सुजाण व समृद्ध माणूस घडतो : सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : केवळ पुस्तकी ज्ञानाचे ओझे वाहणे म्हणजे शिक्षण नव्हे; तर विद्यार्थ्यांमधील कल्पकता, विचारशीलता आणि सुप्त गुणांना धुमारे फोडून एक संवेदनशील नागरिक घडवणे हीच काळाची गरज आहे. ग्रामीण मातीत उपजत प्रतिभेची कोणतीही कमतरता नाही, उणीव असते ती केवळ एका योग्य संधीची आणि दर्जेदार व्यासपीठाची. 'सृजनरंग' हे केवळ स्पर्धांचे मैदान नसून विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला पंख देणारा मुक्त संवाद आहे. कला आणि साहित्याची ओढ माणसाला माणसाशी जोडते. मविप्र संस्था ही केवळ पदव्या देणारी संस्था नसून प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूल्यनिष्ठ व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी सदैव कटिबद्ध आहे असे परखड प्रतिपादन मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय निफाड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे, तसेच राष्ट्रीय सेवा योजना रासेयो विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सृजनरंग स्पर्धा २०२६' या भव्य जिल्हास्तरीय सांस्कृतिक व साहित्यिक महोत्सवाचे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात उद्घाटन झाले, नाशिक जिल्ह्यातील सर्व स्तरातून आलेल्या विविध महाविद्यालयांतील ५५० हून अधिक युवक-युवतींनी सहभाग नोंदवून या महोत्सवात आपल्या उपजत कलागुणांचा आविष्कार घडवला.



व्यासपीठावर अध्यक्षस्थानी मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, संचालक शिवाजी गडाख, सा. फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सागर वैद्य, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. उत्तमराव डेर्ले, प्राचार्य डॉ. व्हि. बी. काळे, शिवशाहीर समाधान हेगडे पाटील, गायक अनुपम चिंचोरे, डॉ.डी.के. आहेर, अशोक कुंदे, राजाराम काळे, रमेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगतात सभापती बाळासाहेब क्षीरसागर म्हणाले, आपली भारतीय संस्कृती, लोककला आणि मूल्यांचा वारसा अत्यंत समृद्ध आहे.... विद्यार्थ्यांनी जय-पराजयाचा विचार न करता स्वतःमधील उणिवांवर मात करून आत्मविकासाची वाट चोखाळावी असा मोलाचा संदेश दिला. सागर वैद्य यांनी म्हटले की, आधुनिक जगात कला, संस्कृती, माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात अमर्याद व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत. त्यामुळे निव्वळ पुस्तकी ज्ञान घेणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा कलेची जाण आणि कौशल्य असणारा कलासंपन्न विद्यार्थी समाजात स्वाभिमानाने जगतोच, शिवाय अधिक प्रभावीपणे अर्थार्जन करून स्वतःच्या पायावर उभा राहतो. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच आपल्यातील कलेची जोपासना करून तिला आर्थिक सक्षमतेचे माध्यम बनवावे.

प्राचार्य डॉ. व्हि. बी. काळे यांनी प्रास्ताविकातून 'सृजनरंगची' भूमिका सविस्तर मांडली. ते म्हणाले, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या मुलांमध्ये अंगभूत कलागुण ठासून भरलेले असतात. महाविद्यालयाच्या माध्यमातून त्यांच्या या सृजनशीलतेला हक्काचा मंच मिळावा आणि ग्रामीण प्रतिभा मुख्य प्रवाहात चमकावी, हाच या आयोजनाचा मुख्य उद्देश आहे.

यावेळी स्पर्धेचे मूल्यमापन पारदर्शक होण्यासाठी समाधान हेगडे, अनुपम चिंचोरे, किशोर गोसावी, विनायक पवार, विवेक उगलमुगले, सुहास सुरळीकर, रमेश वाघ, विजयकुमार सोनवणे, भालचंद्र सूर्यवंशी, संदीप कुरकुटे, प्राजक्ता देशमुख, भूषण सोनवणे या एकूण १२ नामांकित तज्ज्ञ परीक्षकांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन डॉ. महेश बनकर यांनी केले तर आभार डॉ. रवींद्र अहिरे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीततेसाठी महाविद्यालयांचे सर्व प्राध्यापक, विभाग प्रमुख, रासेयो कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी प्रतिनिधी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# पशुधनाच्या पाण्याच्या टँकरची संख्या वाढवा : आमदार समाधान आवताडे

## आमदार समाधान आवताडे यांच्या मागणीची पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून दखल; तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीमुळे पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जनावरांची संख्या आणि त्यांच्या प्रत्यक्ष पाण्याची गरज लक्षात घेऊन प्रति जनावर पिण्याच्या पाण्याचे प्रमाण लिटरमध्ये वाढवावे, तसेच त्यानुसार टँकरची संख्या वाढवून पुरेसा पाणीपुरवठा करावा, अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीची दखल घेत पालकमंत्री ज यकुमार गोरे यांनी संबंधित विभागाला तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

मतदारसंघातील गावांमध्ये पावसाअभावी पाणीटंचाई तीव्र झाली असून, त्याचा फटका नागरिकांसह पशुधनालाही बसत आहे. जनावरांची तहान भागविण्यासाठी पशुपालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. दुष्काळामुळे चारा आणि पाण्याची व्यवस्था करताना पशुपालकांवरील आर्थिक भार वाढत असून, जनावरांचे संगोपन करणेही जिकिरीचे बनले आहे. या पार्श्वभूमीवर पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला आहे.

शासनाच्या सध्याच्या निकषांनुसार मोठ्या देशी जनावरांसाठी दररोज ३५ ते ४० लिटर, तर लहान जनावरांसाठी १० ते १५ लिटर पाणी गृहीत धरले जाते. संकरित गाईंसाठी दररोज १०० ते ११० लिटर, तर लहान संकरित गाईंसाठी ३५ ते ४० लिटर पाणी आवश्यक असते. मात्र, मतदारसंघातील गावांमधील पशुधनाची एकूण संख्या आणि जनावरांच्या प्रत्यक्ष पाण्याची गरज लक्षात घेता, सध्याच्या निकषांनुसार मंजूर होणारे पाणी अपुरे पडत असल्याचे आमदार आवताडे यांनी निवेदनात निदर्शनास आणून दिले आहे.

केवळ प्रचलित निकषांनुसार पाणी मंजूर करण्याऐवजी संबंधित गावातील पशुधनाची संख्या, जनावरांचा प्रकार आणि त्यांना दररोज लागणारे पाणी यांचा विचार करून प्रत्येक जनावरासाठी पिण्याच्या पाण्याचे प्रमाण लिटरमध्ये वाढवावे. त्यानुसार गावनिहाय पाण्याची गरज निश्चित करून आवश्यक तेवढे टँकर मंजूर करावेत, अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे. जनावरांच्या प्रत्यक्ष गरजेइतके पाणी उपलब्ध झाल्यास पशुधनाची तहान भागविण्यास मदत होईल, असेही त्यांनी निवेदनातून निदर्शनास आणून दिले आहे.

दुष्काळाच्या काळात पशुधनाचे संरक्षण होण्याबरोबरच पशुपालकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी हा प्रश्न प्राधान्याने सोडविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. आमदार समाधान आवताडे यांनी केलेल्या मागणीची पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दखल घेत संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याने, दुष्काळग्रस्त भागातील पशुपालकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## आढाळा शाळेत नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने जागर स्त्री - शक्तीचा सन्मान कर्तुत्वाचा हा अभिनव उपक्रम




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क.**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढाळा येथे उपक्रमशील मुख्याध्यापक राजेंद्र बिक्कड यांच्या संकल्पनेतून व उपक्रमशील शिक्षिका शिवानंद स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने जागर स्त्रीशक्तीचा सन्मान कर्तुत्वाचा हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षिका शिवनंदा स्वामी यांनी केले.

आजचे पहिले पुष्प प्रसिद्ध शिवव्याख्याते श्री. महादेव खराटे यांच्या अभ्यासपूर्ण वाणीतून राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या चरणी अर्पण करण्यात आले. याप्रसंगी जिजाऊंच्या लेकी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतून माँसाहेब जिजाऊ यांचे कार्य विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक तुकाराम कराळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जेष्ठ शिक्षक बलभीम राऊत यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी शाळेच्या वतीने सर्व उपस्थित माता पालक व विद्यार्थी यांना केळीचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला गावातील बहुसंख्या माता पालक उपस्थित होत्या. नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने दररोज एक याप्रमाणे भारताच्या, महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये प्रचंड मोठे कार्य केलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, झाशीची राणी लक्ष्मीबाई, माता रमाबाई, सरोजिनी नायडू, प्रसिद्ध धावपटू पी टी उषा, शास्त्रज्ञ अंतराळवीर कल्पना चावला, सुनीता विल्यम, अनाथाची माय सिंधुताई सपकाळ, ज्येष्ठ समाजसेविका सुधा मूर्ती इत्यादी कर्तुत्वान महिलांची यशोगाथा विद्यार्थ्यांना सांगितली जाणार आहे.

# सोलापूर मुख्य डाकघरात 'राष्ट्रीय टपाल दिना'निमित्त टपाल कर्मचाऱ्यांचा भव्य सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : ऊन्ह, वारा, पावसाची पर्वा न करता समाजातील प्रत्येक घटकापर्यंत निष्ठेने आणि प्रामाणिकपणे टपाल सेवा पोहोचविणाऱ्या पोस्टमन बांधवांचा व टपाल कर्मचाऱ्यांचा गौरव करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे, या उदात्त भावनेतून रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रो आणि भावसार व्हिजन - सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर मुख्य पोस्ट ऑफिस येथे 'राष्ट्रीय टपाल दिन' (छर्रीेंळपरश्र झेीीं ऊ) अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मुख्य टपाल कार्यालयासह सोलापूर शहरातील इतर कार्यालयांतील सर्व पोस्टमन, कार्यालयीन कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचा फेटा बांधून, सन्मानपत्र व हँड नॅपकीन देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात रोटे. डॉ. श्रीकांत अंजुटगी यांच्या प्रास्ताविकाने झाली. या प्रसंगी बोलताना त्यांनी नमूद केले की, आजच्या आधुनिक व डिजिटल युगातही टपाल खात्याचे आणि पोस्टमन बांधवांचे स्थान अढळ आहे. तळागाळातील नागरिकांना जोडणारा आणि विश्वासार्हता जपणारा मुख्य दुवा म्हणजे टपाल सेवा होय.

अध्यक्ष रोटे. दिनेश काटकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगीतले की, रोटरी क्लब ही आंतरराष्ट्रीय स्तरावर 'सेवा परमो धर्म:' या तत्त्वावर कार्य करणारी संस्था असून समाजात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या घटकांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणे हे रोटरीचे मुख्य उद्दिष्ट आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रवर अधीक्षक डाक घर सोलापूर श्री. हेमंत खडकेकर यांनी टपाल विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध सेवा व योजनांबद्दल माहिती दिली. तसेच येत्या काळात 'ब्लिंकइट'च्या धर्तीवर बुक केलेले टपाल अवघ्या काही तासांत घरपोच पोहोचवणारी अतिजलद टपाल सेवा सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी विशेषरीत्या नमूद केले.

या सोहळ्यास टपाल कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचा व अधिकाऱ्यांचा अत्यंत उत्स्फूर्त आणि भरघोस प्रतिसाद मिळाला. भगवे फेटे परिधान केलेल्या पोस्टमन बांधवांमुळे संपूर्ण सभागृहात आणि परिसरात विशेष उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. योगिन गुर्जर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर उपस्थितांचे आभार रोटे. महेश नक्का यांनी मानले.

या सोहळ्यास श्री. सुरेश बनसोडे, श्री. सोमनाथ काळे, श्री. प्रफुल बंगाळे, श्री. संदीप घोडके, श्री. राहुल शित्रे आणि श्री. श्रीरंग रेगोटी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रोचे सचिव रोटे. कल्लाप्पा गुरव, रोटे. विश्वनाथ कोळी, रोटे. अमित कामतकर आणि भावसार व्हिजनचे श्री. आशिष जवळकर, श्री. निशिकांत पुकाळे, श्री. रमेश माळवे, श्री. मनोज क्षीरसागर, श्री. विशाल खमितकर, श्री. हर्षल माळवदकर व इतर सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या विशेष सन्मानाने भारावून गेलेल्या सर्व पोस्टमन व टपाल कर्मचाऱ्यांनी रोटरी क्लब ऑफ सोलापूर मेट्रो व भावसार व्हिजन परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले.

# शहराच्या विकासात पत्रकारांची भूमिका मोलाची : महापौर विनायक कोंड्याल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : लोकशाहीमध्ये पत्रकारितेचे स्थान महत्त्वाचे असून पत्रकार समाजातील विविध प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. शहराच्या विकासातही पत्रकारांची भूमिका मोलाची आहे. त्यामुळे पत्रकारांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी महापालिका सकारात्मक दृष्टिकोन ठेवेल. पत्रकारांच्या गृह प्रकल्पासाठी सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिली.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते सोमवारी महापौर कार्यालयात करण्यात आला.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती

### श्रमिक पत्रकार संघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा महापालिकेत सत्कार

सभापती रंजिता चाकोते, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर आणि नगरसेवक मनीष केत आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सोलापूर श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी चौदाव्यांदा निवड झाल्याबद्दल विक्रम खेलबुडे , सरचिटणीस आफताब शेख , खजिनदार विजय गायकवाड, उपाध्यक्ष अविनाश गायकवाड, नितीन पात्रे,

चिटणीस रतन (आप्पा) बनसोडे, प्रीतम पंडित, सहचिटणीस रोहित थळवे, कार्यकारिणी सदस्य रवी ढोबळे, श्रीनिवास मावनूर, गौतम गायकवाड, विक्रांत कालेकर, सचिन जाधव, यशवंत गुरव, नितीन कटके, मुजम्मील शाहनूरकर, सागर इप्पलपल्ली, महेश कुलकर्णी. सल्लागार प्रशांत जोशी आदींसह पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांनी सोलापूर शहर विकासासाठी सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे.

पत्रकारांच्या गृहप्रकल्प सोयी सुविधायुक्त व्हावा यासाठी नेहमी सहकार्याची भूमिका राहील, असे आश्वासन देत नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक व सूत्रसंचालन पत्रकार किरण बनसोडे यांनी केले. जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार यांनी आभार मानले.

**विनापरवाना खरेदी-विक्रीवर कायदेशीर कारवाई होणार**

**पणन संचालकांचे परिपत्रक जारी**

# बाजार आवाराबाहेर फळे-भाजीपाला खरेदीसाठी परवानाच बंधनकारक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शेतकऱ्यांकडून बाजार आवाराबाहेर होणाऱ्या फळे, भाजीपाला, आले, लसूण, धणे आणि मिरची या शेतमालाच्या विनापरवाना खरेदी-विक्रीला आळा घालण्यासाठी राज्याचे पणन संचालक संजय कदम यांनी दि. ३० सप्टेंबर २०२६ रोजी महत्त्वाचे परिपत्रक जारी केले आहे.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ नुसार शेतमाल उत्पादकांची फसवणूक होऊ नये आणि खरेदीदाराला एकत्रित माल मिळून प्रतवारी ठरवणे सोईचे व्हावे यासाठी नियंत्रित बाजार क्षेत्र स्थापन करण्यात आले आहेत. या कायद्यांतर्गत खाजगी बाजार, थेट पणन परवाना, एकल बाजार परवाना, शेतकरी-ग्राहक बाजार असे पर्याय निर्माण करण्यात आले आहेत.

परिपत्रकातील ठळक मुद्दे :



१) दि. ३१/१२/२०२५ च्या शासन राजपत्रान्वये अधिनियमाच्या कलम ६ मध्ये पोट-कलम (२अ) मध्ये सुधारणा झाली आहे. त्यानुसार कलम ५(ड) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे लायसन अथवा परवानगी आवश्यक असेल, मात्र अशा परवानाधारकाकडून बाजार समितीला कोणतेही बाजार शुल्क (सेस) आकारता येणार नाही अशी तरतूद समाविष्ट करण्यात आली आहे.

२) असे असतानाही काही व्यापारी या कार्यालयाकडून किंवा बाजार समित्यांकडून कोणतीही वैध अनुज्ञप्ती / परवाना न घेता बाजार आवाराबाहेर थेट शेतकऱ्यांकडून फळे व भाजीपाला खरेदी करीत असल्याच्या आणि बाजार समिती व खाजगी बाजारात लिलावाशिवाय खरेदी होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

पणन संचालकांनी दिलेल्या सूचना :

परवानाच बंधनकारक - या कार्यालयामार्फत देण्यात येणारे खाजगी बाजार परवाना, थेट पणन परवाना, एकल बाजार परवाना आणि बाजार समितीमार्फत देण्यात येणारा व्यापारी अनुज्ञप्ती / खरेदीदार परवाना धारण करणाऱ्या व्यापाऱ्यांनाच अधिसूचित शेतमालाची खरेदी करता येईल.

नियमनमुक्त मालालाही परवाना लागणार - कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाजार आवाराबाहेर फळे आणि भाजीपाला व नोंदीत मसाले - (२- आले), (३- लसूण), (४- धणे) आणि (५- मिरची) हा शेतमाल नियमनमुक्त करण्यात आला आहे. तरीही तो अधिसूचित शेतमाल असल्याने त्याची बाजार आवाराबाहेरील खरेदी संबंधित बाजार समितीकडील व्यापारी अनुज्ञप्ती व थेट पणन परवाना, खाजगी बाजार परवाना, एकल बाजार परवाना धारण करणाऱ्यांनाच करता येईल.

विनापरवाना व्यवहारावर कारवाई - बाजार समित्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात व्यापाऱ्यांकडून होणाऱ्या विनापरवाना खरेदी-विक्रीला आळा घालण्यासाठी अधिनियमातील कलम ४६ आणि कलम ५२ नुसार असलेल्या अधिकारानुसार कारवाई करावी.

बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही परिस्थितीत अधिसूचित कृषी उत्पन्नाची विनापरवाना व्यापार होणार नाही याची दक्षता घ्यावी. आले, लसूण, धणे, मिरची या नियमनमुक्त शेतमालावर बाजार फी बसविता येणार नाही. विक्रीस आणलेल्या शेतमालाचे नाव, वजन, बाजारभाव व शेतकऱ्यास द्यावयाची रक्कम याचा तपशील असलेली पावती देणे प्रत्येक व्यापाऱ्यावर बंधनकारक राहील. शेतकऱ्यांनी परवाना नसलेल्या व्यापाऱ्यास माल विकू नये यासाठी जनजागृती करावी.

सदर परिपत्रकीय सूचना सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी आपल्या अधिनस्त तालुका उप / सहाय्यक निबंधक व सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि खाजगी बाजारांना निदर्शनास आणून काटेकोरपणे पालन होईल असे पहावे, असे निर्देश पणन संचालक (महाराष्ट्र राज्य, पुणे) श्री. संजय कदम यांनी दिले आहेत.